पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर – ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दूरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१/७२/ (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: cap@sus.ac.in

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

जा. क्र. पुअहोसोविसो/प.व मू.मं./फोटोकॉपी विभाग/मार्च-२०२६/ 733

दिनांक: 17 MAY 2026

## परिपत्रक /14

विद्यापीठाशी संलग्नित असणा-या सर्व महाविद्यालयाच्या/संस्थेच्या प्राचार्य/संचालक तसेच प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुलाचे संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें-२०२३ च्या सत्रापासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील सर्व विषयांच्या परीक्षा महाविद्यालयस्तरावर घेण्यात येत असल्याने सदरच्या अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना द्याव्या लागणार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) आणि त्यानंतर होत असलेल्या उत्तरपत्रिकांच्या पूनर्मूल्यांकन (Revaluation) चे काम महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत यापूर्वीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे **"मार्च/एप्रिल-२०२६"** या सत्रात ही सदर कामकाज महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

**"मार्च/एप्रिल-२०२६"** च्या सत्रात वरील पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष वगळता, उर्वरीत सर्व अभ्यासक्रमातील विषयांच्या फोटोकॉपीची छायांकित प्रत (Photocopy) विद्यापीठामार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी ऑक्टो/नोव्हें-२०२५ च्या सत्राप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे विहीत वेळेत अर्ज करणे बंधनकारक आहे.

सदर कामी विद्यार्थ्यांचा पीआरएन नंबर (PRN) हा त्यांचा युजरनेम आहे. सदर बाब सर्व पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. (उदा. User name : PRN 1234567890)

१. Ordinance O.106(B) 2015 अन्वये वरील अभ्यासक्रमातील विषयाचा निकाल लागल्यापासून १५ दिवसापर्यंत विद्यार्थ्यांकडून पारंपारिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांने प्रति उत्तरपत्रिका शुल्क रु.२००/- आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रति उत्तरपत्रिका शुल्क रु.३००/- ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांने अर्जासोबत जमा करणे आवश्यक आहे. नियमानुसार **प्रति सत्र केवळ दोन विषयांच्या** उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपीसाठीच विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल.

२. वरील अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील ज्या विषयांची फोटोकॉपी विद्यापीठाकडून देण्यात आलेली आहे. त्याच विषयांच्या उत्तरपत्रिकेचे पूनर्मूल्यांकन करावयाचे झाल्यास विद्यार्थ्यांने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

सर्व अभ्यासक्रमातील विषयांच्या फोटोकॉपीचे पूनर्मूल्यांकन करण्याकरीता प्रति विषय रु.५००/- शुल्कासह फोटोकॉपी मिळाल्यापासून ७ दिवसापर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील.

३. वरील पाच अभ्यासक्रमातील **"फक्त प्रथम वर्षातील"** विषयांचे पूनर्मूल्यांकन महाविद्यालयस्तरावर झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचे गुण सिलबंद लखोटयामध्ये भरुन मा.प्राचार्यामार्फत परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडे जमा करावेत.

४. उपरोक्त माहिती सादर करताना खालील तक्त्यामध्येच सादर करावी.

| Sr. No. | Course | Branch | Seat No. | PRN No. | Subject | Subject Code | Max Marks | Min. Marks | Obt. Marks | Reval Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

५. ऑनलाईन पध्दतीने फोटोकॉपी व पूनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्यासाठी **https://pahsusis.studentscenter.in** या लिंकचा वापर करावा.

६. वरीलप्रमाणेच OSM अभ्यासक्रमाच्या (सर्व पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रम व बी.ए.एल.एल.बी., एल.एल.बी., बी.टेक., बी.आर्किटेक्चर, बी.फार्मसी, बी.एड. बी.पी.एड.) फोटोकॉपी व पूनर्मूल्यांकनासाठी कार्य पध्दती वापरावी.

**(महत्वाची सूचना : बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. बी.बी.ए. व बी.सी.ए. या अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील सर्व परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात येत असल्याने त्यांचे फोटोकॉपी व पूनर्मूल्याकंन महाविद्यालय स्तरावर करण्यात येत आहे. परंतू सदर अभ्यासक्रमातील विद्यार्थी वर दर्शविलेल्या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज/फर्म भरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, त्यास्तव आपणास विनंती आहे की, सदर विद्यार्थ्यांना सूचित करावेत की, फोटोकॉपी व पूनर्मूल्याकंन हे महाविद्यालय स्तरावर केले जाते अशी सूचना द्यावी/निदर्शनास आणून द्यावे)**

(डॉ.श्रीकांत ग. अंधारे)
संचालक, प. व मू. मं.

प्रत :

१. संगणक विभाग, प. व मू. मं.
२. मे. एज्युलॅब एज्युकेशनल एक्सचेंज प्रा.लि., मुंबई